राष्ट्रीय आरोग्य अभियान (पी.आय.पी.) अंतर्गत उपलब्ध असलेल्या अनुदानातून HWC आरोग्यवर्धिनी केंद्र-उपकेंद्र यांचेकरीता संगणक व प्रिंटर तसेच समुदाय आरोग्य अधिकारी, आरोग्यवर्धिनी केंद्र-उपकेंद्र व NCD अंतर्गत आरोग्य सेविका तसेच नागरी प्राथमिक आरोग्य केंद्रांसाठी (UPHC) यांना Tablet खरेदीस प्रशासकीय मान्यता मिळणेबाबत.

महाराष्ट्र शासन
सार्वजनिक आरोग्य विभाग
शासन निर्णय क्रमांकः प्रशामा-०६१९/प्र.क्र.४१३/आरोग्य-७

१० वा मजला, गो. ते. रूग्णालय संकूल इमारत,
नवीन मंत्रालय, मुंबई - ४००००१.
दिनांक : ०६ सप्टेंबर, २०१९.

वाचा :-

१) सहसंचालक, आरोग्य सेवा (खरेदी कक्ष), आरोग्य सेवा संचालनालय, मुंबई यांचे पत्र क्र. संआसे/खरेदीकक्ष/रा.आ.अ./संगणक व प्रिंटर, टॅबलेट खरेदी प्र.शा.मा./१५१५-१९/२०१९, दिनांक १९ जून, २०१९.

२) सहसंचालक, आरोग्य सेवा (खरेदी कक्ष), आरोग्य सेवा संचालनालय, मुंबई यांचे पत्र क्र. राआसो/HWC/Tablet/Desktop/खरेदी/५०५९५-५९६/२०१९, दिनांक १९ ऑगस्ट, २०१९.

३) आयुक्त (आरोग्य सेवा) तथा अभियान संचालक, राष्ट्रीय आरोग्य अभियान, मुंबई यांच्याकडील दिनांक १९ जून, २०१९ व दिनांक ०७ ऑगस्ट, २०१९ रोजीची मान्य टिप्पणी.

प्रस्तावना:-

राष्ट्रीय आरोग्य अभियान (पी.आय.पी.) अंतर्गत उपलब्ध असलेल्या अनुदानातून HWC आरोग्यवर्धिनी केंद्र-उपकेंद्र यांचेकरीता संगणक व प्रिंटर तसेच समुदाय आरोग्य अधिकारी, आरोग्यवर्धिनी केंद्र-उपकेंद्र व NCD अंतर्गत आरोग्य सेविका तसेच नागरी प्राथमिक आरोग्य केंद्रांसाठी (UPHC) यांना Tablet खरेदी अंदाजित रक्कम रु.२४१३.३६ लक्ष इतक्या रकमेच्या खर्चाच्या प्रस्तावास प्रशासकीय मान्यता मिळण्याबाबतची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

शासन निर्णय :-

राष्ट्रीय आरोग्य अभियानांतर्गत सन २०१९-२० या आर्थिक वर्षातील मंजूर कृती आराखडयामधील मंजुर अनुदानातून आरोग्यवर्धिनी (HWC) केंद्र-उपकेंद्र यांचे माहिती व तंत्रज्ञान सुविधा बळकटीकरण यासाठी समुदाय आरोग्य अधिकारी, आरोग्यवर्धिनी केंद्र-उपकेंद्र, NCD अंतर्गत आरोग्य सेविका तसेच नागरी प्राथमिक आरोग्य केंद्रांसाठी (UPHC) आवश्यक असलेले टॅबलेट, संगणक व प्रिंटर खरेदी अंदाजित रु.२४१३.३६ लक्ष इतक्या रकमेच्या खर्चाच्या प्रस्तावास प्रशासकीय मान्यता

मिळण्याबाबतचा प्रस्ताव सहसंचालक, आरोग्य सेवा (खरेदी कक्ष), मुंबई यांनी शासनास सादर केलेला आहे. सदर खरेदी प्रस्तावास आयुक्त (आरोग्य सेवा) तथा अभियान संचालक, राष्ट्रीय आरोग्य अभियान, मुंबई यांनी मान्यता दिलेली आहे. त्यानुषंगाने सहसंचालक, आरोग्य सेवा (खरेदी कक्ष), मुंबई यांनी सादर केलेल्या निविदा प्रक्रियाद्वारे खरेदी करण्याकरीता अंदाजित रक्कम रु. २४१३.३६ लक्ष इतक्या रकमेच्या प्रस्तावास पुढील विवरणपत्रातील खालील अटींच्या अधीन राहून प्रशासकीय मान्यता देण्यात येत आहे.:-

विवरणपत्र

Name of Bureau	Sr. No.	Name of Scheme	FMR Code PIP 2019-20	Name of Item's / Particular	Proposed Qty.	Approx. Rate Per Unit (Rs.)	Required Total Amt. (In Lakhs)	Approved Budget (In Lakhs)
Joint Director (Technical) NHM, Mumbai	1	Tablets ; Software for H & WC and ANM / MPW	6.1.2.5.a	Purchase of **Tablets** for CHO	3752	12000	450.24	312.00
	2	Procurement of Universal Screening of NCD's	6.1.2.6.a	Purchase of **Tablet** for ANM under NCD	4026	12000	483.12	660.00
Addl. Mission Director, NHM, Mumbai	3	HWC NUHM	U.17.1	Purchase of **Tablets** for (HWC - UPHC)	2000	12000	240.00	200.00
Joint Director (Technical) NHM, Mumbai	4	Tablets ; Software for H & WC and ANM / MPW	6.1.2.5.a	Purchase of Desktop & Printers for (HWC - SC)	2080	50000	1040.00	1040.00
Addl. Mission Director, NHM, Mumbai	5	HWC NUHM	U.17.1	Purchase of Desktop & Printers for (HWC - UPHC)	400	50000	200.00	200.00

अटी :-

१) सदर संगणक व प्रिंटर, टॅबलेटची आवश्यकता / मागणी याची शहानिशा / खातरजमा करण्यात यावी. त्यानंतरच सदर बाबींच्या खरेदीसाठी निविदा प्रक्रिया राबविण्यात यावी.

२) सदरहू संगणक व प्रिंटर, टॅबलेटचे विनिर्देश गरजेनुसार व अद्ययावत असल्याची खातरजमा करण्यात यावी. खरेदी करावयाच्या बाबींचे तांत्रिक विनिर्देश (Technical specification) संबंधित तज्ञांनी (तांत्रिक समिती / अधिकारी) यांनी मान्य केलेल्या विनिर्देशानुसार असावेत. तसेच,

सदर तांत्रिक विनिर्देश (Technical specification) हे कोणत्याही विशिष्ट कंपनीला फायदा होईल अशा रितीने तयार केलेले नसल्याबाबत खातरजमा करण्यात यावी. पीआयपी मध्ये मंजूर असलेल्या बाबींच्या तांत्रिक विर्निदेशानुसार मागणीपत्र पाठविण्याची जबाबदारी संबंधीत कार्यक्रम प्रमुखांची राहिल. प्रस्तावातील समाविष्ट असलेल्या बाबींचीच खरेदी करण्यात यावी.

३) शासन निर्णय, उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग, क्र. भांखस-२०१४/प्र.क्र.८२/भाग-III/ उद्योग-४, दिनांक १ डिसेंबर, २०१६ अन्वये प्रसिध्द करण्यात आलेल्या शासकीय विभागांनी करावयाच्या कार्यालयीन खरेदीसाठीच्या कार्यपध्दतीची सुधारीत नियमपुस्तिका यामधील तरतूदीनुसार विहित खरेदी प्रक्रिया राबविण्यात यावी.

४) प्रशासकीय मान्यता देताना प्रस्तावित खरेदीचे दर हे अंदाजित आहेत. त्यामुळे GEM Portal, इतर राज्यातील दरकरार, संचालनालय माहिती व तंत्रज्ञान यांच्याकडील उपलब्ध असलेल्या न्युनत्तम दर विचारात घेण्यात यावेत. खरेदी प्रक्रियेअंती दर निश्चित करण्यात यावा. सदर दर हा बाजार भावापेक्षा कमी असल्याबाबत आणि संबंधित पुरवठादाराने या बाबीचा इतर ठिकाणी ज्या दराने पुरवठा केला आहे, त्या दरापेक्षा जास्त नसल्याबाबत खातरजमा करण्यात यावी.

५) खरेदी करण्यात येणाऱ्या बाबींची पुरवठापूर्व / पुरवठानंतर नमुना तपासणी (pre/Post dispatch random sample inspection) करुन उचित व योग्य विनिर्देश (specification) असलेल्या वस्तुंचीच खरेदी करण्यात येईल, याची खात्री करण्यात यावी.

६) खरेदी करण्यात येणाऱ्या बाबींचा पुरवठा झाल्यानंतर त्यांची साठवणूक व वितरण (storage & distribution) करणे तसेच, पुरवठा साखळी व्यवस्थापन (Supply chain management) आणि वस्तुसूची व्यवस्थापन (Inventory Management) योग्य पध्दतीने करुन सदर बाबी विनावापर पडून राहणार नाहीत व त्यांचा विहीत मुदतीत वापर होईल, याची दक्षता घेण्यात यावी.

७) सदरहू खरेदीसाठी होणारा खर्च राष्ट्रीय आरोग्य अभियानांतर्गत प्रकल्प अंमलबजावणी कृती आराखडा सन २०१९-२० मध्ये FMR Code 6.1.2.5.a, 6.1.2.6.a, U.17.1 अंतर्गत उपलब्ध असलेल्या अनुदानातून, लेखाशिर्ष U.6.3.1 मधून रु.४०.०० लक्ष निधी पुर्नविनियोजन (Reappropriate) करुन भागविण्यात यावा. तसेच खरेदी मंजुर अनुदानाच्या विहित मर्यादेतच करण्यात यावी. सदरची खरेदी प्रशासकीय मंजुरीच्या विहित कालावधीत पूर्ण होईल याची दक्षता घ्यावी.

८) तसेच, या बाबींच्या खरेदी द्विरुक्ती (Duplication) होणार नाही, याची दक्षता घेण्यात यावी. याबाबतची संपूर्ण जबाबदारी कार्यक्रम प्रमुखांची राहील.

९) संपूर्ण खरेदी प्रक्रिया राबविताना केंद्रिय दक्षता आयोगाच्या मार्गदर्शक सूचनांचे (CVC Guidelines) तंतोतंत पालन करण्यात यावे.

१०) शासन निर्णय, वित्त विभाग, क्र. विअप्र-२०१३/प्र.क्र.३०/भाग-२/२०१३/विनियम, दिनांक १७ एप्रिल, २०१५ सोबतच्या परिशिष्टातील वित्तीय अधिकार नियम पुस्तिका १९७८, भाग-पहिला

उपविभाग-दोन मधील अ.क्र.४ नियम क्र.७ समोरील स्तंभ क्र.६ येथील अटींची पूर्तता करण्यात यावी.

उपरोक्त अनुक्रमांक १ ते १० येथे नमूद अटींची पूर्तता करण्याची व खरेदी नियमानुसार व आवश्यकते प्रमाणे आहे हे सुनिश्चित करण्याची संपूर्ण जबाबदारी आयुक्त (आरोग्य सेवा) तथा अभियान संचालक, राष्ट्रीय आरोग्य अभियान, मुंबई, संचालक (आरोग्य सेवा), आरोग्य सेवा संचालनालय, मुंबई, सहसंचालक, आरोग्य सेवा (खरेदी कक्ष), आरोग्य सेवा संचालनालय, मुंबई व कार्यक्रम प्रमुख यांची राहील.

शासन निर्णय, वित्त विभाग, क्र.विअप्र-२०१३/प्र.क्र.३०/१३/विनियम, भाग-२, दिनांक १७ एप्रिल, २०१५ मधील वित्तीय अधिकार नियम पुस्तिका १९७८ भाग-पहिला उपविभाग-दोन मधील अनु क्रमांक ४, नियम क्र. ७ अन्वये अवजारे, किरकोळ साधन सामग्री आणि उपक्रम संच विकत घेण्यास मंजूरी देण्यासाठी प्रशासनिक विभागास पूर्ण अधिकार प्रदान करण्यात आले आहेत त्यानुसार सदर शासन निर्णय निर्गमित करण्यात येत आहे.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक 201908131513014517 असा आहे. हा शासन निर्णय डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Varsha Munjaji Bharose

Digitally signed by Varsha Munjaji Bharose
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Public Health Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=2f3096a175796cc670522c4aff97da20b708981b5122e87c8346c4cc7468f821, serialNumber=1bd844032884bbf2167bc99cd85325223aceef69d02bd455b7ca6972491623e0, cn=Varsha Munjaji Bharose
Date: 2019.09.06 14:26:14 +05'30'

(वर्षा मुं. भरोसे)
महाराष्ट्र शासनाचे उप सचिव

प्रत:-

१) आयुक्त, आरोग्य सेवा तथा अभियान संचालक, राष्ट्रीय आरोग्य अभियान, मुंबई.
२) संचालक, आरोग्य सेवा, आरोग्य संचालनालय, मुंबई.
३) अतिरिक्त संचालक (आरोग्य सेवा), राज्य कुटुंब कल्याण कार्यालय, पुणे.
४) सर्व सह संचालक (आरोग्य सेवा संचालनालया मार्फत)
५) सर्व सहसचिव/उपसचिव, सार्वजनिक आरोग्य विभाग.
६) उप संचालक, सर्व मंडळ कार्यालये.
७) सर्व जिल्हा शल्य चिकित्सक (FWB मार्फत)
८) सर्व जिल्हा आरोग्य अधिकारी (FWB मार्फत)
९) निवडनस्ती (आरोग्य-७)